An AIChE Technology Alliance
CCPS Center for Chemical Process Safety
www.aiche.org/ccps

Process Safety Beacon 10 YEAR ANNIVERSARY

http://www.aiche.org/CCPS/Publications/Beacon/index.aspx
उत्पादन क्षेत्रातील व्यक्तिंसाठी संदेश

या आवृत्तीचे प्रायोजक
AcuTech Process Risk Management
www.acutech-consulting.com

# तुमच्या उपकरणांना कशाचा आधार आहे?

फेब्रूवारी २०१३

नोव्हेंबर २०१२ व जानेवारी २०१३ च्या बीकॉनच्या आवृत्तीमधील **छायाचित्र १** तुम्ही ओळखले असेल. चुकीच्या पध्दतीने आधार दिलेल्या वाहीन्यांचे ते एक बोलके उदाहरण आहे. परन्तू काही वेळा अपुरा आधार दिलकल्या वाहीन्या व उपकरणे यांच्याबाबतीतल्या समस्या शोधणे सहज सोपे नसते.

**छायाचित्र २ –** वाहीनीला आधार देणारा लोखंडी आधार सहसा लोखंडाच्या आधार देण्याच्या क्षमतेपेक्षा वाहीन्यांचे वजन जास्त असल्यामुळे वाकला आहे. कदाचित हा एका बदलाचा परीणाम आहे – आधार देण्याऱ्या लोखंडाची क्षमता विचारात न घेता दुसरा वाहीनी वाढवली होती का?

**छायाचित्र ३ –** वाहीनी आडवी सरकली व तिचा आधार टेकूवरून बाहेर सरकला.

**छायाचित्र ४ –** निरखून पहा – लोखंडी आधार जमिनीला टेकलेले नाहीत. ते वाहीन्यांना आधार देण्याऐवजी टांगून राहीले आहेत.

**छायाचित्र ५ –** व्हॉल्व्ह बसविण्यासाठी जागा करण्यासाठी कोणीतरी लोखंडी खांब कापून काढला आहें!

ज्या वाहीन्या व उपकरणांना व्यवस्थित आधार दिलेला नसतो त्या ताण, कंपने व अन्य समस्यांना सामोरे जावे लागू शकते. त्यामुळे गळती होण्याची अथवा अगदी संपूर्ण वाहीनी किंवा उपकरण कोसळण्याची घटना घडू शकते.

तुमच्या कारखान्यात काम करताना पुरेसा आधार नसलेली उपकरणे, बेसुमार कंपने किंवा अन्य तत्सम समस्यांकडे लक्ष द्या. एक चांगला साधा नियम – उभारणीच्या दिवशी जशी स्थिती होती तशी आज नसेल तर काहीतरी समस्या असू रूकते! तुमच्या व्यवस्थापनार समस्येची माहिती द्या आणि समस्येचे निराकरण झाल्याची खात्री करण्यासाठी नियमित पाठपुरावा करा..
















## *तुमच्या वाहीन्या व उपकरणांना योग्य आधार द्या!*

AIChE © 2008. सर्व हक्क राखीव. अव्यावसायिक, शैक्षणिक हेतूसाठी वापरण्यास प्रोत्साहन आहे. तथापि CCPS शिवाय अन्य कोणासही पुनर्विक्रीसाठी वापर करण्यास सक्त मनाई आहे. संपर्क : ccps_beacon@aiche.org किंवा ६४६–४९५–१३७१

हे बीकॉन सहसा अरेबिक, अफ्रीकन, चिनी, डॅनिश, डच, इंग्रजी, फ्रेंच, जर्मन, ग्रीक, गुजराती, हिब्रू, इटालियन, जपानी, कोरियन, मालय, मराठी, नॉर्वेजियन, पर्शियन, पोलीश, पोर्तुगीज, रोमानियन, रशियन, स्पॅनिश, स्वीडीश, तेलगू, थाई, तुर्की, आणि व्हीएतनामी इत्यादी भाषांमध्ये उपलब्ध आहे.

This Beacon is translated in Marathi by Mr. S.K. Gulawani, Maharashtra, India.